| | | | |
|---|---|---|---|
| दिनांक : 26 - 10 -23 | **प्र.स.प. - २०२३** | **A** | वेळ : 3 तास |
| इयत्ता : 9 वी | विषय : मराठी (L.L) | | गुण - 80 |

**कृतिपत्रिकेसाठी सूचना : -**

१) सूचनेनुसार आकलनकृती व व्याकरण यांमधील आकृत्या काढाव्यात.

२) आकृत्या पेननेच काढाव्यात..

३) उपयोजित लेखनातील कृतींसाठी (सूचना,निवेदन ) आकृतीची आवश्यकता नाही.तसेच या कृती लिहून घेऊ नयेत.

४) विभाग -५ उपयोजित लेखन प्र.५ (अ) ( २) सारांशलेखन या घटकासाठी गद्य विभागातील प्र.१ (इ) अपठित उतारा वाचून त्या उताऱ्याचा सारांश लिहावयाचा आहे.

५) स्वच्छता,नीटनेटकेपणा व लेखननियमांनुसार लेखन यांकडे जाणीवपूर्वक लक्ष द्यावे.

---

## (विभाग :१ - गद्य )

**प्र.१ अ) पुढील उतारा वाचून दिलेल्या सूचनांनुसार कृती करा.**

**१) आकृतिबंध पूर्ण करा.** ०२

१) लेखकाला या प्रश्नांचे उत्तर सापडेना

पितापुत्र गेले आणि प्रत्येक वेळी मिळणाऱ्या शिरीषच्या तऱ्हेवाईक उत्तराचे आश्चर्य करीत मी बसलो.प्रत्येक वेळी तो नानांचे नाव का घेतो व नाना अगदी रोज त्याच्याबरोबर येतात,याचे रहस्य काय असावे या प्रश्नाचे उत्तर मला सापडेना.याशिवाय आणखीन एक शंका माझ्या मनात वरचेवर येत असे.ती म्हणजे,नाना जवळ असताना शिरीष मोकळ्या मनाने व्हायोलिन वाजवत नसावा ही.दुसरेच दिवशी शिरीष आला नाही.त्याचा हा पहिला खाडा.नसेल एखादवेळेस जमले,असे मी समाधान करून घेतले;पण त्याच्या दुसऱ्या दिवशीसुद्धा शिरीष आला नाही.चौथा दिवस गेला.पाचवा गेला आणि तसेच पंधरा दिवस गेले!शिरीषचा पत्ता नव्हता.सोळाव्या दिवशी एक मनुष्य निरोप व फीचे पैसे घेऊन आला.'नाना आजारी असल्यामुळे

शिरीष येऊ शकणार नाही ',असे तो म्हणाला.थोड्याशा त्राग्यानं मी म्हणालो,'नानांशी त्याला काय करायचे आहे!इकडे कार्यक्रम जवळ येत चालला आहे, त्याचे काय?'शिरीष आला नाही,त्याची वाट पाहून मी त्याचा कार्यक्रम रद्द केला.त्याचे नाव पण काढायचे नाही, असे ठरवून मी बाकीचे विद्यार्थी तयार केले.समारंभाचा दिवस उगवला आणि सकाळपासून शिरीषच्या आठवणीने मी उगाचच बेचैन झालो होतो.सकाळची इतर कामे आटोपून मी जरा स्वस्थ बसतो न बसतो तोच दारात शिरीष उभा!मी ताडकन उभा राहिलो व त्याच्या जवळ गेलो.

२) **खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.** ०२

अ) शिरीषने न येण्याचे कोणते कारण कळवले ?

ब) लेखकाच्या मनात वरचेवर कोणती शंका येत असे ?

३) **शिरीषची भूमिका तुम्हांला कोणता संदेश देते, ते तुमच्या शब्दांत लिहा.** ०३

**प्र.१ आ)पुढील उतारा वाचून दिलेल्या सूचनांनुसार कृती करा.**

१) चौकटी पूर्ण करा. ०२

अ) इ.स.१८९४ साली या देशात 'ऑलिंपिक काँग्रेस ' भरवण्यात आली होती - ................

ब) ऑलिंपिक सामन्यांचे पुनरुज्जीवन करणारे क्रीडातज्ञ - ....................

मैत्रीचा मंत्र सांगणाऱ्या या ऑलिंपिक सामन्यांची त्यानंतर इ.स.१८९४ साली आधुनिक जगाला आठवण झाली.त्या वर्षी फ्रान्स देशात एक 'ऑलिंपिक काँग्रेस'भरवण्यात आली होती.त्या काँग्रेसला अनेक राष्ट्रांचे प्रतिनिधी हजर होते.कुबर टीन नावाच्या फ्रेंच क्रीडातज्ज्ञाने या क्रॉंग्रेसमध्ये ऑलिंपिक सामन्यांचे पुनरुज्जीवन केले.शरीरसंपदा वाढवण्यासाठी,बलसंवर्धन करण्यासाठी आणि प्रामुख्याने देशादेशांतील मैत्री वाढून त्यांच्यात मित्रत्वाची स्पर्धा व्हावी यासाठी प्राचीन ऑलिंपिक सामन्यांप्रमाणेच यापुढे आंतरराष्ट्रीय क्रीडास्पर्धा भरवाव्यात असे ठरले.१८९६पासून ऑलिंपिक सामने दर चार वर्षांनी वेगवेगळ्या देशांत भरवले जातात.त्या निमित्ताने जगात सद्भावना,समता,मैत्री, विश्वबंधुत्त्व, शिस्त व ऐक्य या भावना वाढीस लागतात.

या सामन्यांत निरनिराळ्या एकवीस खेळांची तरतूद आहे.पुरुषांसाठी व स्त्रियांसाठी वेगवेगळे सामने होतात.या सामन्यांच्या व्यवस्थेसाठी एक आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक समिती नेमलेली असते.या स्पर्धांत भाग घेणाऱ्या प्रत्येक देशाचे एक ते तीन प्रतिनिधी या समितीत असतात.या समितीमध्ये खेळांची व्यवस्था त्या त्या खेळांच्या आंतरराष्ट्रीय संघाकडे असते.ऑलिंपिक सामन्यांसाठी लागणारा खर्च फारच मोठा असतो.हा सर्व पैसा स्पर्धक देश उभा करतो.

**२) उताऱ्याच्या आधारे वाक्य पूर्ण करा.** ०२

अ) १८९६ पासून सामने ........................

ब) या सामन्यांत निरनिराळ्या ......................

३) 'ऑलिंपिक म्हणजे विश्वबंधुत्व ' ही संकल्पना स्पष्ट करा. ०३

## अपठित गद्य

**प्र.१ इ) खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

१) कारण लिहा. ०१

खोडाला अन्ननलिका म्हणतात;कारण ......................

२) पुढील घटकाचे कार्य एका वाक्यात लिहा. ०१

फूल -

वनस्पती प्राण्यांप्रमाणे इतस्तत: फिरत नाहीत.त्यांच्या मुळांमुळे त्या जमिनीत रुतलेल्या असतात.अन्नरस मिसळलेले जमिनीतील पाणी मूळ शोषून घेते आणि ते वनस्पतीच्या इतर भागांना पोहोचवते.डेलिया आणि गाजरासारखी काही मुळे अन्न साठवतात.

पानांना सूर्यप्रकाश आणि हवा मिळावी,म्हणून खोड वनस्पतीला वर उचलते.खोड ही अन्ननलिकासुद्धा आहे.मुळाकडून ते अन्न घेते.पान सूर्यप्रकाश आणि हवा वापरून वनस्पतीला जगण्यासाठी आवश्यक असलेले अन्न तयार करते.बाष्प निघून जाण्यासाठी पानांत छिद्रे असतात.या छिद्रांमधूनच ते प्राणवायू श्वसनाच्या रूपाने घेते.फूल बिया निर्माण करते आणि त्यांतून नवीन वनस्पती वाढतात.

३) आकृती पूर्ण करा. ०२

उताऱ्यात आलेली झाडाच्या अवयवांची नावे

१) मूळ
२) ....................
३) ....................
४) ....................
५) ....................

## विभाग - २ ( पद्य )

**प्र.२ अ) पुढील कवितेच्या आधारे सूचनांनुसार कृती करा.**

**१) कोष्टक पूर्ण करा.** ०२

| वाट बघणारा | कोणाची वाट बघतो | वाट बघण्याचे कारण |
|---|---|---|
| भुकेलेले बाळ | .................. | .................... |
| ............ | पांडुरंगाची | .................... |

भेटीलागीं जीवा लागलीसे आस।
पाहे रात्रंदिवस वाट तुझी।।१।।
पूर्णिमेचा चंद्रमा चकोराजीवन।
तैसें माझें मन वाट पाहे।।२।।
दिवाळीच्या मुळा लेंकीं आसावली।
पाहातसे वाटुली पंढरीची।।३।।
भुकेलिवा बाळ अति शोक करी।
वाट पाहे उरि माउलीची।।४।।
तुका म्हणे मज लागलीसे भूक।
धांवूनि श्रीमुख दांवी देवा।।५।।

**२) चौकटी पूर्ण करा.** ०१

अ) काल्पनिक पक्षी - ....................

ब) कवितेत उल्लेखलेले सण - ....................

३) योग्य अर्थ शोधा. ०१

अ) आस लागणे म्हणजे ......................

१) ध्यास लागणे २) उत्कंठा वाढणे ३) घाई होणे

आ) वाटुली म्हणजे ....................

१) धाटुली २) वाट ३) वळण

४) प्रस्तुत कवितेतील खालील शब्दांचा अर्थ लिहा. ०२

१) शोक २) दिवस ३) आस ४) मन

५) भावार्थाधारित. ०२

संत तुकारामांनी पांडुरंगाच्या भेटीबाबत दिलेल्या दृष्टान्तातील तुम्हाला आवडलेला दृष्टांन्त स्पष्ट करा.

प्र.२ आ) खालील दोन कवितांपैकी कोणत्याही एका कवितेसंबंधी दिलेल्या मुद्दयांच्या आधारे कृती सोडवा.

मुद्दे : अ) संतकृपा झाली ब) व्यायामाचे महत्त्व

१) कवितेचे कवी / कवयित्री ०१

२) कवितेचा विषय ०१

३) कवितेतून मिळणारा संदेश ०२

४) कविता आवडण्याची वा न आवडण्याची कारणे - ०२

५) प्रस्तुत कवितेतील शब्दांचा अर्थ लिहा. ०२

अ) संतकृपा झाली -

१) ध्वज २) किंकर

३) आवार ४) देवालय

आ) व्यायामाचे महत्त्व -

१) मित्र २) वैरी

३) शरीर ४) मानव

## विभाग - ३ ( स्थूल वाचन )

३) **खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा.** ०६

१) 'व्यंगचित्रे हे व्यक्तीचे गुण -दोष मांडण्याचे प्रभावी अस्त्र आहे.' हा विचार सोदाहरण स्पष्ट करा.

२) काझीरंगा अभयारण्याची भौगोलिक वैशिष्ट्ये लिहा.

३) टीप लिहा - गेंड्याच्या सवयी

४) व्यंगचित्र रेखाटणे ही कला आत्मसात करण्यासाठी कोणत्या गुणांची आवश्यकता असते, यासंबंधी तुमचे विचार लिहा.

## विभाग - ४ ( भाषाभ्यास )

प्र. ४) अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती :

१) पुढील वाक्यांचे प्रकार ओळखा. ०२

अ) हा बांबू कोणत्या जातीचा असावा ?

ब) दररोज व्यायाम करा.

२) खालील उदाहरणातील उपमेय,उपमान, साधर्म्यवाचक शब्द व अलंकार लिहा. ( कोणतेही एक ) ०२

अ) तिचे डोळे कमळाच्या पाकळ्यांसारखे सुंदर आहेत.

ब) फुलपाखरु मला फूलच वाटे.

३) पुढील सामासिक शब्दांचा विग्रह करून समास ओळखा.(फक्त एक ) ०१

अ) मीठभाकरी ब) चार -पाच

४) खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा. (कोणतेही एक) ०२

अ) आटापिटा करणे ब) मात करणे

५) खालील तक्ता पूर्ण करा. ०१

| शब्द | मूळशब्द | सामान्यरुप |
|---|---|---|
| खेळांची | खेळ | ............. |
| होतात | ........... | होता |

आ)भाषिक घटकांवर आधारित कृती : शब्दसंपत्ती :

१) शब्दसमूहाबद्दल एक शब्द लिहा. ०१

कार्यक्रम ऐकणारे -

२) खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा. ०१

अ) नवीन ब) डावा

३) वचन बदला. ०१

अ) शोध ब) तुकडे

४) खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा. ०१

अ) मित्र ब) श्रम

२) लेखननियमांनुसार लेखन : अचूक शब्द निवडा ०२

अ) कंतृत्व, कर्तृत्व,कृर्तत्व,करतृत्व

ब) परिस्थिती, परिस्थीती,परीस्थिती, परीस्थीती

३) विरामचिनहे :

पुढील विरामचिन्हे व त्यांच्या नावांच्या जोड्या लावा. ०२

| अ - गट | ब - गट |
| --- | --- |
| अ) , | १) प्रश्नचिन्ह |
| ब) ! | २) अर्धविराम |
| क) ; | ३) स्वल्पविराम |
| ड) ? | ४) उद्गारचिन्ह |

विभाग - ५ ( उपयोजित लेखन )

प्र.५ अ) पुढीलपैकी कोणतीही एक कृती सोडवा. ०६

१)

जीवनज्योती विद्यालय

नांदगाव

कथाकथन स्पर्धा पारितोषिक

वितरण समारंभ

दि. २२ जुलै

वेळ :दुपारी ४ वा.

प्रमुख पाहुणे - मा.श्री.अजय लागू अध्यक्ष: मा.श्री.उत्तम कांबळे

संपर्क : jivanjyotividyalay@gmail.com दिपक / दिपाली माने

विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने

पारितोषिक प्राप्त विद्यार्थी सुहास / सुनीता देसाई, यांचे अभिनंदन करणारे पत्र लिहा.

किंवा

पारितोषिक वितरण समारंभासाठी अध्यक्ष म्हणून मा.उत्तम कांबळे यांना उपस्थित राहण्याची विनंती करणारे पत्र

किंवा

२) **सारांश लेखन :** विभाग १ गद्य प्र.क्र.१ -(इ) मधील अपठित गद्य उताऱ्याचा १/३ एवढा सारांश तुमच्या शब्दांत लिहा.

**प्र.५ आ) खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा.** १०

१) **जाहिरात लेखन : (५०-६० शब्द) पुढील विषयावर जाहिरात तयार करा.**
योगासन वर्गाची जाहिरात तयार करा.

२) **कथालेखन :(८०-९० शब्द) खालील मुद्दयांच्या आधारे कथा लिहा.**

मुद्दे : अनाथ मुलगा ----------रोज सकाळी वर्तमानपत्राचे वाटप --------दुपारी शाळेत ---------रस्त्यात एक पाकीट मिळते ----------वर्गशिक्षकांकडे देणे ----------पाकिटावरील पत्यावरून योग्य व्यक्तीपर्यंत पोहचवणे ----------मालकाला आनंद -----------शाबासकी मुलाला बक्षीस व त्याच्या शिक्षणाची जबाबदारी घेणे.

३) **बातमी लेखन -(५०-६० शब्द)** तुमच्या शाळेत १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्य दिन साजरा झाला. या कार्यक्रमाची बातमी लिहा.

**इ) खालील लेखनप्रकारांपैकी कोणतीही एक कृती सोडवा.(१००-१२० शब्द)** ०८

१) **प्रसंग लेखन .**

**तुम्ही पाहिलेल्या जत्रेच्या प्रसंगाचे लेखन पुढील मुद्दयांच्या आधारे करा.**

मुद्दे : जत्रेचे ठिकाण -----------वर्णन ----------आजूबाजूची दृश्ये --------भक्तांची गर्दी ----------जत्रेतील खेळ ----------लोकांची गर्दी ---------घरी परतणे.

२) **आत्मकथन : चौकटीत दिलेल्या घटकाचे आत्मकथन लिहा.**

पुस्तक

निर्मिती | प्रकार | महत्त्व | आधुनिक रुप

३) वैचारिक लेखन : - 'पाण्याचे महत्त्व 'या विषयावर तुमचे विचार मांडा.